International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासी कोरकू बोलीचा समाजभाषा वैज्ञानिक दृष्टिकोन

**डॉ. वीणा सुधाकर माळी**
*पोस्ट डॉक्टरेट संशोधक,*
*भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद (ICSSR )*
***Corresponding Author – डॉ. वीणा सुधाकर माळी***
**DOI - 10.5281/zenodo.17657064**

***सारांश:***

*समाजभाषा विज्ञानाच्या अभ्यासक्षेत्राचा विचार करता भाषा व्यवहार आणि भाषेची व्यवस्था निश्चित करून भाषेच्या सामाजिक अंगाकडे लक्ष केंद्रित करून कोणत्याही समाजाची जडणघडण त्या समाजाच्या भाषिक जडणघडणीवरून समजून घेता येते. कोरकू आदिवासी बोलीचा या दृष्टिकोनातून प्रस्तुत लेखात अभ्यास केला आहे.*

**प्रास्ताविक:**

१९ व्या शतकातील आव्हानात्मक अभ्यास क्षेत्र म्हणून भाषाविज्ञानाकडे पाहिले गेले. अलीकडच्या काळात बोलींचा अभ्यास सामाजिक आणि भौगोलिक दृष्टीने करण्याची गरज निर्माण झाल्यानंतर बोलींच्या माध्यमातून सामाजिक, सांस्कृतिक सूक्ष्म बारकावे नोंदविल्या गेले. यानिमित्ताने बोलींचे स्वरूप समज-गैरसमज, संस्कृती आणि शिक्षणाचे माध्यम म्हणून बोलींकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन उदयाला आला. महाराष्ट्र राज्याची भाषा मराठी असली तरी प्रादेशिक भागांनुसार अनेक बोली बोलल्या जातात. कोरकू बोलीचे भौगोलिक क्षेत्र हे खानदेशाला लागून असलेल्या सातपुड्याच्या पर्वतरांगापासून ते पंचमढीच्या डोंगरांपर्यंत पसरलेले आहे. ही बोली निमाडमधील खरगोन, अरसिगड, खंडवा, हरदा, बराणपूर, मेळघाट, बेतुल, होशंगाबाद या प्रदेशाला वळसा घालून दक्षिणेला अकोला, बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यातील सातपुड्याच्या पायथ्यापर्यंत विस्तारलेली आहे. वऱ्हाडी बोलीच्या प्रदेशाशी तिचा निकटचा संबंध आहे. या परिसरात बोलल्या जाणाऱ्या बोलींना कोरकू बोली असे म्हटले जाते. २००१ च्या जनगणनेनुसार कोरकू बोली बोलणाऱ्यांची संख्या ५,७४,००० एवढी आहे.

**कोरकू बोली आणि अन्य घटक:**

परिसराची भौगोलिक रचना, जीवनपद्धती आणि निसर्ग यांचा परिणाम बोलींवर होत असतो. कोरकू बोलीभाषेच्या बाबतीतही आपल्याला असे म्हणता येऊ शकते. कोरकूची वस्ती पठारांवर आणि पर्वताच्या उतारावर तसेच दऱ्या खोऱ्यांमध्ये जास्त प्रमाणात आढळते गावापासून लांब असलेल्या तसेच स्वतःची वेगळी वस्ती करून राहणाऱ्या या वस्त्यांना आदिवासी पाडा म्हणून ओळखले जाते. वैशिष्ट्यपूर्ण अशा या पाड्यांवर घरांची रचनाही वैशिष्ट्यपूर्ण असते.

लाकडी-मातीचे किंवा कौलारू, ठेंगणी व बसकी घरे इथे दिसून येतात.

**जीवनपद्धती**:

कोरकू आदिवासींचे जीवन पद्धती इतर समाजाहून वेगळी असल्याचे दिसून येते. त्यांचे सामाजिक संबंध रक्त आणि दर्जा यावर आधारलेले असतात. आपले संबंधांना त्यांच्या जीवनात खूप महत्त्वपूर्ण स्थान असते व्यक्तीव्यक्तीचे संबंध करारात्मक नसतात त्यांची सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था कार्यक्षम व मजबूत असते रीतिरिवाज, रूढी, परंपरा, धर्मश्रद्धा इत्यादी त्यांचे सामाजिक जीवन नियंत्रित करतात समान सांस्कृतिक जीवन असल्याने त्यांचे खाणे-पिणे, आचार- विचार, केशभूषा, वेशभूषा आणि एकूणच जीवन विषयक दृष्टिकोन यामध्ये समानता आढळते. सामाजिक एक्यभाव कोरकू समुहातील जीवनपद्धतीत विशेषत्वाने दिसून येतो. विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थित्यंतरामुळे या जमातीच्या वास्तव्याचे जीवनपद्धतीमध्ये सुद्धा अलीकडच्या काळात बदल होताना दिसतो.

**कोरकू बोलीभाषेचे वैशिष्ट्ये आणि बोलीचा समाजभाषावैज्ञानिक दृष्टिकोन:**

आदिवासी समाज हा इतर कोणत्याही समाजापेक्षा अनेक दृष्टीने वेगळा असल्याचे दिसून येते. कोरकू आदिवासी जमात याला अपवाद नाही. विशिष्ट भूप्रदेश एकाच रक्तसंबंधावर आधारित तसेच पारंपरिक वेगळी जीवनपद्धती ,साधी अर्थव्यवस्था, सामाजिक एकजिनसीपणा, समानधर्म आणि स्वतःच्या बोलीभाषेचा वापर या अशा अनेक सामाजिक वैशिष्ट्यांचा विचार इथे समाविष्ट आहे. कोरकू बोलीभाषेचा विचार करता आदिवासी कोरकू समाजातील सर्व व्यक्तींना एकत्र जोडणारा व दीर्घकाळ एकत्रित धागेत बांधून ठेवणारा अत्यंत महत्त्वाचा दुवा म्हणजे त्यांची स्वतःची बोलीभाषा होय. कोणत्याही समाजाची भाषा म्हणजे त्या समाजाच्या जीवनाचे प्रतिबिंब असते. कोरकू आदिवासींची स्वतःची अशी स्वतंत्र बोलीभाषा आहे. समूहाच्या नावावरूनच भाषेचे नाव पडलेले दिसून येते. भाषेतील शब्दांमधून त्यांचे सामाजिक संबंध, श्रद्धा, नातेगोत्याचे संबंध व्यक्त होतात. कोरकूने आपली सांस्कृतिक परंपरा, लोकवाङ्मय याच बोलीभाषेत जपल्याचे दिसते. मिलिंद बोकील म्हणतात त्याप्रमाणे, महाराष्ट्रात कोरकू हीच कोल मुंडारी जनसमुहांपैकी प्रमुख जनजाती आहे. पूर्वेला गोंड, कोलाम आणि द्रविड भाषा समूहांपैकी आहेत. तर उत्तर पश्चिम महाराष्ट्रातील आदिवासी समूह हे भिल्ली भाषांच्या प्रभावाखालचे आहेत. थोडक्यात कोल मुंडारी जनसमुहाचे प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रात कोरकुंचे स्थान अनन्यसाधारण आहे.

**अ ) व्याकरण व्यवस्था**: कोरकू बोलीत नामाला लिंग, वचन आणि विभक्ती यांचे विकार लागतात. कोरकू बोलीत स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी असे दोनच भेद आहेत. सजीवांमधील मनुष्यप्राणी व काही मनुष्येतर प्राणी यांचा लिंगभेद विशिष्ट प्रत्ययांच्या किंवा स्वतंत्र शब्दांच्या सहाय्याने दाखविला जातो. मनुष्येतर प्राण्यांसाठी कोणताही लिंग प्रत्यय नाही. काही व्यवसायवाचक नामांना विशिष्ट प्रत्यय लावून स्त्रीलिंगी रूप साधले जाते.

उदा. धोटा - पुरुष
जापाय - स्त्री
कोमबा - कोंबडा
सिम - कोंबडी

कोरकू बोलीत सर्वनामांचे एकवचनी, द्विवचनी आणि अनेकवचनी रूपे सापडतात. नामांप्रमाणे सर्वनामांसाठी विभक्ती प्रत्यय लागतात. सजीव निर्जीवांसाठी स्वतंत्र दर्शक सर्वनाम वापरले जातात. तसेच कोरकू बोलीत विशेषणे, सामान्यरूप लिंग वचन यांच्यानुसार विनियोगक्षम नसतात म्हणजे त्यांना रूपदृष्ट्या कोणतेही विकार जडत नाही या बोलीत नामांच्या वस्तू वाचक निर्जी रूपांना लिंग वचन व सामान्य रूपाचे विकार लागत नसल्याने तीच व्यवस्था विशेषणच्या बाबतीतही कायम राहते तरी अर्थदृष्टी मात्र ते नामाच व्याप्ती मर्यादित करत असल्याने विकार समजल्या जातात.

उदा. सरका - सरळ

साजाका - चांगला

पेळया - आळशी

क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्द म्हणजे धातू होय. या धातूला विविध प्रकारचे प्रत्यय लागून क्रियापदाची साधना होत असते. धातूच्या प्रत्यययुक्त रूपाद्वारे काळ, अर्थ, क्रिया,पुरुष, लिंग आणि वचन या व्याकरणी क्रिया दर्शविल्या जातात. कोरकू बोलीत लिंगविकार क्रियापदांना होत नाही. मात्र येथे एकाव्ययी क्रियापदे, द्विअव्ययी क्रियापदे आणि त्रिअव्ययी क्रियापदे आढळतात.

**उदा.** ओर - उगवणे

आटा - जेवणे

इडि - पोहणे

नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद या शब्दांच्या विकारी जातींच्या संदर्भात आपण थोडक्यात कोरकू बोलीची व्याकरण व्यवस्था समजून घेण्याचा प्रयत्न केला.

**ब ) ध्वनिव्यवस्था**: कोरकू बोली मध्ये अ, आ, इ, उ, ए, ओ असे एकूण ०६ स्वर स्वनिम आढळतात. तर इतर २९ व्यंजन स्वनिम आढळतात. कोरकू बोलीतील वाक्यात येणाऱ्या वेगवेगळ्या शब्दांवर कधी कमी- अधिक बलाघात दिल्यास वाक्याचा अर्थ बदलताना दिसतो. मराठी प्रमाणे वाक्यातील ध्वनींचे चढ उतारानुसार उच्चारण केल्यास तसेच वाक्यातील खंड किंवा विराम बदलला तर वाक्याचा अर्थ बदलताना दिसतो.

**उदा.**

**बलाघात:**

कोरकू - सियालिएन भुरिकु सुबानकेन.

मराठी - झाडावर पक्षी बसलेला आहे.

( पक्षी झाडावर बसलेला आहे. इतर दुसरीकडे नाही )

**सुरावली :**

कोरकू - केरू चिरमाखे मुनडाखेनेज

मराठी - केरूने चोराला मारले

(मुनडाखेनेज या शब्दाला समतल , आरोही , अवरोही या सुरावलीनुसार उच्चारल्यास वाक्याचा अर्थ बदलताना दिसतो. समतोलमध्ये विधानार्थी वाक्य तयार होते. आरोही सूरयोजन केल्यावर प्रश्नार्थक वाक्य तयार होते. अवरोही सूरयोजन केल्यास आश्चर्यकारक किंवा उद्गारवाचक वाक्य तयार होते )

**सीमासंधी**

कोरकू - इनिज डिज बान

मराठी - हा तो नाही

कोरकू - इनिज डि जबान

मराठी - ही ती जबान( शब्द देणे )

(वाक्यातील खंड किंवा विराम बदलला की वाक्याचा अर्थ बदलताना दिसतो. कोरकू बोलीत हा प्रकार अत्यल्प प्रमाणात आढळतो)

**क) भाषिक भांडार:** समाजभाषाविज्ञानातील भाषिक भांडार ही एक महत्त्वाची संकल्पना आहे. कोणत्याही

समाजातील व्यक्ती एकाच प्रकारची भाषा वापरताना दिसत नाही. कोणाशी? कधी? काय? किती? कसे? बोलावयाचे याचे काही संकेत ठरलेले असतात. प्रत्येक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी बोलत असताना समोरच्या व्यक्तीचे वय, लिंग, समाजातील स्थान, प्रसंग याचा विचार करून बोलत असते आणि म्हणूनच व्यक्ती स्थळ, काळ, वेळ याचा विचार करून बोलण्याच्या क्षमतेला संदेशनक्षमता असे म्हणतात. कोरकू भाषेचा विचार करता या भाषेमध्ये मर्यादित भाषिककोश असला तरीही ही बोली संदेशनक्षम असणारी बोली आहे. कोरकू समाजातील लोक परस्पर विनिमयासाठी कोरकू बोलीचा प्रयोग करतात. येथील समाज दैनंदिन गरजा भागविण्यासाठी किंवा इतर विविध कारणांसाठी कोरकू, हिंदी, इंग्रजी आणि मराठी या भाषेतीलही काही शब्दांचा वापर करतात. कोरकू व्यक्ती संदर्भानुसार, प्रसंगानुसार आणि सामाजिक संकेतानुसार आपली भाषा बदलताना दिसते. परस्पर सहकार्यामुळे निर्माण झालेले सामाजिक नात्यांचे स्वरूपही या बोलीतून दिसून येते. ही बोली भाषिक भांडारयुक्त, स्वयंपूर्ण अशी बोली आहे.

**ड ) भाषा मिश्रण:** उच्चारणाच्या दृष्टीने अतिशय साधी आणि सरळ असलेल्या कोरकू बोलीचे स्वरूप कठीण व बोजड वाटत असली तरी कोरकू व्यक्ती बोलताना त्यातील ओघवतेपणा सहज स्पष्ट होताना दिसतो. कोरकू शब्दभांडार अल्प असले तरी या भाषेमध्ये हिंदी, मराठी, निमाडी आणि गोंडी मधील अनेक शब्द समाविष्ट होताना दिसतात. हे शब्द आपल्या स्वतंत्र अस्तित्वाने शब्दाचे अनेक अर्थ व्यक्त करताना दिसतात. कोरकू लोक इतर लोकांशी बोलताना मात्र हिंदी भाषेचा वापर करतात तर बहुतांश कोरकूंना चांगले मराठी बोलता येते.

**हिंदी** - कागज ( कागजो ), बरसात ( बरसातो ), मन्नत ( मन्नतो )

**मराठी** - कपाट ( कपाटो ), पिक ( पिको), पोलिस ( पुलिसो )

**इंग्रजी** - स्कूल ( ईस्कूल), टाईम ( टेम ), डॉक्टर ( डाकटर)

हिंदी, मराठी,वऱ्हाडी आणि इंग्रजी भाषेतील शब्द कोरकू भाषेत स्वीकारताना ते त्यांच्या बोली भाषेत उकारांत रूपाचे अकारांत रूपात स्वीकारताना दिसतात. इतर भाषांच्या प्रभावामुळे कोरकूंच्या मौखिक परंपरा प्रभावीत झालेल्या दिसतात. अनेक लोकगीतांमधून हिंदी भाषेतील शब्द समावेशित झालेले दिसतात.

**इ) भाषाभेद:** भाषा भेदाची कक्षा अतिशय व्यापक आहे. व्यक्तीच्या समाजातील दर्जानुसार बोलण्यामध्ये जे फेरफार घडून येतात ते आपल्याला दैनंदिन व्यवहारिक भाषेतून सातत्याने जाणवतात. यातील संवाद हा सामाजिक घटकांनुसार तसेच शैलीनुसारही वेगळा होताना दिसतो. आपल्या औपचारिक व अनौपचारिक बोलण्यामध्ये जो भेद दिसून येतो त्याचाही यात समावेश होतो. सामाजिक भाषाभेद अभ्यासणे म्हणजे सुस्पष्ट असे बोलीभेद अभ्यासण्यासारखे आहे. समाजातील वर्णव्यवस्थेशी संबंधित भेद अभ्यासताना आदिवासी बोली संदर्भात याचा विचार करता हा भेद प्रामुख्याने वर्णभेदावर वर्गीकृत न होता समूह आणि प्रादेशिक भाग या संदर्भात सुद्धा अभ्यासता येतो. भाषाभेदाचा विचार करता अनेकदा इतर भाषांमध्ये लेखनात व सार्वजनिक भाषणात श्रेष्ठ संमत भाषा वापरली जाते. या उलट आदिवासी बोलींमध्ये लोकांच्या अनौपचारिक किंवा नेहमीच्या व्यवहारातील बोलण्यामध्ये असलेली विविधता अधिक प्रमाणात दिसून येते. इथे आपण

लिंगभेद हे भाषाभेदाचे कारण जेव्हा म्हणतो आहोत तेव्हा या अनुषंगाने पुरुष व स्त्रिया यांच्यातील भाषाभेदाचा विचार आपल्याला करता येतो उदाहरणादाखल इथे काही नमुने घेता येईल.

स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या स्वभाववैशिष्ट्यांवरून समाजात त्यांच्या वेगवेगळ्या प्रतिमा उमटलेल्या दिसतात.

**उदा.पुल्लिंगी विशेष नामे** - सोमा ( सोमवारी जन्मलेला),मंगळ( मंगळवारी जन्मलेला) ,बुडा( आळशी), ढोल्या ( शरीरयष्टीने धष्टपुष्ट ), भुऱ्या ( गौरवर्णीय)

**स्त्रीलिंगी विशेष नामे** - फुलय (फुलासारखी ), सोनय ( सोन्यासारखी ), रत्नाय( रत्नासारखी) , रुपय( सुंदर ), भुलाय( देवीचे नाव )

समाजातील बदलत्या नातेसंबंधावर आणि भाषा व्यवहारातील व्यक्तीच्या कौटुंबिक अस्तित्वाबद्दल पुरुष आणि स्त्रियांच्या भूमिका वेगवेगळ्या असल्याने त्यांच्या बोली भाषेतील भेदातून ते निदर्शनास येते.

उदा. पुल्लिंगी नामे - अबा (वडील), बोको (भाऊ), कोन (मुलगा)

**स्त्रीलिंगी नामे** - माय (आई ), बोकोजे( बहिण), कोनजे ( मुलगी)

मराठीप्रमाणे कोरकू बोलीतही आदरार्थी संबोधनाच्या माध्यमातून नात्यांमधील प्रेम, आदरभाव, स्त्री - पुरुष भेदांच्या संदर्भातही तो दिसून येतो.

थोडक्यात उदाहरणदाखल आपण लिंगभेद भाषेचा विचार इथे केला. परंतू भाषाभेदाचा विचार हा भाषाभाषांतील देवाण-घेवाण, परभाषेबद्दल आस्था, भाषांतरादी माध्यमातून आत्मसातीकरण या मानवी प्रवृत्तींचा व वर्तनाचा अभ्यास समाजभाषाविज्ञानाचाही विषय होऊ शकतो हेही विशेष इथे नोंदविण्यासारखे आहे.

समाजामध्ये भाषा कधी? कशा? पद्धतीने वापरली जाते याचा स्वतंत्रपणे अभ्यास समाजभाषा विज्ञानात केला जातो. आदिवासी कोरकू बोलीभाषेच्या निमित्ताने आपण कोरकू समूहामध्ये वावरत असताना कोरकू व्यक्ती परस्परांशी बोली भाषेच्या माध्यमातून कशा पद्धतीने संप्रेषण साधतात हे पाहिले. कोरकू बोली भाषेचे वैशिष्ट्य, व्याकरण, ध्वनीविचार आणि समाजभाषाविज्ञानातील महत्त्वाच्या संकल्पना जसे की, भाषिक भांडार, भाषामिश्रण आणि भाषाभेद यासारख्या संकल्पनांचा आढावा प्रस्तूत संशोधनात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

1. भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण - ( संपा.) अरुण जाखडे/ गणेश देवी
2. कोरकू बोली : वर्णनात्मक आणि समाजभाषावैज्ञानिक अभ्यास- काशिनाथ बऱ्हाटे
3. भारतातील आदिवासी वंश - वि. श्री. कुलकर्णी
4. आदिवासी संस्कृती : भाषा आणि साहित्य - पुष्पा गावित
5. लँग्वेस्टिक सर्वे ऑफ इंडिया - जॉर्ज ग्रिअर्सन